# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## सहायक (पूर्व) परीक्षा -२०१५

**जाहिरात क्रमांक : ५१/२०१५** **क्रमांक १४४२(३)(१)/२०१५/तीन**

शासनाच्या मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयातील **एकूण ९६** पदांच्या भरतीकरिता आयोगातर्फे **सहायक (पूर्व) परीक्षा-२०१५ रविवार दिनांक ५ जुलै,२०१५** रोजी महाराष्ट्रातील **३६ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३. जे उमेदवार अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व या पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**४. उपलब्ध पदसंख्या**
**मंत्रालयीन विभाग ८५ पदे व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय ११ पदे**

| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ( १) | (२) | (३) | ( ४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | सहायक (एकूण पदे ९६) | ५३ | १४ | ४ | ५ | २ | ४ | ३ | १ | १० |
| | महिला * | १७ | ४ | १ | २ | -- | १ | १ | -- | ३ |
| | खेळाडू ☑ | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | विकलांग व्यक्ती @ | ९६ पदांपैकी एकूण ४ पदे = अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision) - २<br>श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)- १ + १=२ | | | | | | | | |

५. *** अशी खूण केलेली पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. ☑ अशी खूण केलेली पदे खेळाडूंकरिता आरक्षित आहेत.. @ अशी खूण केलेली पदे विकलांग व्यक्तींकरिता आरक्षित आहेत.**

५.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

५.२ वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

५.३ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. **आयोगाच्या कार्यालयातील अ.जा. १, भ.ज.(ब)१, भ.ज.(क)१, भ.ज.(ड)१,विमाप्र-१ व खुला पदाच्या वर्गवारीच्या ६ पदांसाठी खेळाडू वर्गवारीचे आरक्षण लागू नाही. तसेच अपंग व्यक्तींकरिता रिक्त पद १ आहे.**

५.४ महिलांसाठी असलेले आरक्षण शासननिर्णय महिला बालविकास व विभाग क्र.८२/२००१/म.से.आ. २०००/प्र. क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

५.५ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. **खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे, संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन ठेवावीत.**

५.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

५.७ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांसाठी विहीत केलेली वयामर्यादा, परीक्षा शुल्क, तसेच इतर पात्रता विषयक अटी / निकषासंदर्भात कोणतीही सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

५.८ विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. विकलांगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

५.९ विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून ७ दिवसांच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे अनिवार्य आहे.**

५.१० प्रस्तुत पदासाठी अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision) - २ श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)- १ + १=२ या विकलांगता प्रकाराकरिता ४ पद राखीव आहे. तथापि, शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. एएससी १४११/प्र.क्र.७/११/१४-अ, दिनांक १३ जानेवारी, २०११ नुसार इतर विकलांगता (अंधत्व किंवा क्षीणदृष्टी व श्रवणशक्तीतील दोष) असलेले उमेदवार त्या त्या जातीच्या वर्गवारीतून सदर पदाकरिता अर्ज करु शकतात.

**६. वेतनश्रेणी :-** रूपये ९,३००-३४८००(ग्रेड पे-४,३००) अधिक नियमानुसार भत्ते.

**७. पात्रतेच्या अटी :-**

**७.१.** भारतीय नागरिकत्व.

**७.२** वयोमर्यादा :- **दिनांक १ सप्टेंबर , २०१५** रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असावी व ३३ वर्ष पूर्ण केलेले नसावे.

**७.३** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**७.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**७.३.२** विकलांग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

**७.३.३** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**७.३.४** माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगस्ट, २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

**७.३.५** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**७.३.६** वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

**८. शैक्षणिक अर्हता :-**

**८.१** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**८.२** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु सहायक (मुख्य) परीक्षा -२०१५ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी सहायक (मुख्य) परीक्षा २०१५ करिता माहिती स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**८.३** अंतर्वासिता (Intership) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांनी अंतर्वासिता परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**८.४** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**८.५** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

**९.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्विकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील " **सहायक परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१० शुल्क** : **१०.१** अमागास - **३६५/-** **१०.२** मागासवर्गीय - **२६५/-** **१०.३** माजी सैनिक - **१५/-**

**१०.४** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी(नागरिक सेवा केंद्र)

**१०.५** https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

**११. अर्ज करण्याची पद्धत :-**

**११.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**११.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १३ मे, २०१५ ते दिनांक २ जून, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहिल.

**११.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**११.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.५** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने माझे ॲप्लीकेशन सदरातील स्पर्धात्मक परीक्षा या लिंकवर क्लिक करावे.

(३) स्पर्धात्मक परीक्षा या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी " '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(४) " **Pay Now** " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. १. ऑनलाईन पेमेंट २. नागरी सुविधा केंद्र ३. चलानद्वारे

(५) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(६)नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(७) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(८)भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.६ केंद्र निवड :-**

(१) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता " माझे खाते " मधील संबंधित पदाची निवड करावी. त्यानंतर " केंद्र निवडा " या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमते इतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(२) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडिची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यावाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**११.७** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २ जून, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१४.चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ३ जून, २०१५ पर्यंत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१५. सहायक (पूर्व) तसेच (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १३ मे, २०१५**

**श्री. शं. पाठक**
**उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**